
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 10 | NOVEMBER - 2023

# "भाषाविज्ञान: अध्ययन आणि अध्यापन"

**प्रा. डॉ. पी. आर. जाधव**
मराठी विभागप्रमुख, स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय,
नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.

## प्रस्तावना: -




'भाषेला साध्य म्हणून केल्या जाणाऱ्या शिस्तबद्ध अभ्यासाला भाषाशास्त्र' असे आत्तापर्यंत म्हटले जात असे. 'भाषाशास्त्र' या ऐवजी आज 'भाषाविज्ञान' हा शब्द वापरला जातो. संज्ञाबदलामागे भाषाविषयक बदलेला दृष्टीकोन आहे. इतर विज्ञानामध्ये अभ्यास विषयांचा ज्या पद्धतीने अभ्यास केला जातो ती पद्धत इथे अभिप्रेत आहे. भाषाविज्ञानत भाषेचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो. हा अभ्यास वस्तुनिष्ठ असतो. त्यात साधनसामुग्रीचा संग्रह, सामग्रीचे सूक्ष्म निरीक्षण, पृथक्करण आणि त्याआधारे तटस्थपणे काढण्यात आलेल्या निष्कर्षांना महत्त्व असते. विगामी पद्धतीने केला जाणारा भाषेचा अभ्यास वर्णनात्मक असतो.

भाषा म्हणजे काय?

"भाषा ही सानुक्रम ध्वनी रचनांच्या सांकेतिकरणावर आधारलेली संज्ञापन प्रणाली आहे"(१)

मौखिक ध्वनिप्रतिकांची संकेताधिष्ठित संप्रेषणप्रणाली म्हणजे भाषा ! मानवी समाजाची अवघी प्रगती त्याने अर्जित केलेल्या भाषेमुळे झालेली आहे. संप्रेषणाचे, संदेशनाचे अत्यंत प्रभावी असलेले भाषा हे साधन आपण विचार मांडणे, भावना व्यक्त करणे, वर्णन करणे, आज्ञा देणे, साहित्य निर्माण करणे अशा अनेकविध व्यापारासाठी वापरत असतो. भाषेमुळे केवळ विचार व्यक्त करता येतात असे नव्हे; तर मनामध्ये विचार करण्याची जी प्रक्रिया घडते तीही भाषेमुळेच होत असते. मानव आणि मानवेतरांच्या जगात प्रचंड अंतर पडण्याचे कारण मानवाने उपलब्ध करून घेतलेले भाषा हे साधन होय.

## भाषाविज्ञान: अध्ययन

भाषाविज्ञान भाषेचे अध्ययन करताना प्रथम हे लक्षात घ्यावे लागते की, येथे भाषेकडे कशाचे तरी साधन म्हणून पाहता भाषेला साध्य म्हणून तिचा अभ्यास केला जातो. साहित्य निर्मितीसाठी केला जाणारा भाषेचा वापर एक प्रयोग झाला. भाषाविज्ञानाच्या 'शैलीविज्ञान'या विभागात साहित्यातील भाषेचा अभ्यास केला जातो हे खरे; पण भाषा विज्ञानात भाषेकडे

सामाजिक संस्था म्हणून पाहिले जाते. मुले, वृद्ध, शिक्षित, अशिक्षित, शहरी, ग्रामीण असे तऱ्हेतऱ्हेचे घटक आपले व्यवहार पार पाडण्यासाठी संदेशनासाठी जी भाषा वापरतात तिचा अभ्यास भाषाविज्ञानात होत असतो.

भाषाविज्ञानाच्या परिचयातून हेही आवर्जून सांगितले जाते की, मौखिक भाषा हे भाषेचे मूळ रूप आहे. सिध्दरूप आहे आणि लिखित भाषा हे या सिध्दभाषेचे साधित रूप आहे. भाषेचे अध्ययन तिच्या मूळ रूपाच्या संदर्भात करावयाचे असते. लिखित भाषेवरून उच्चारक-श्राव्य भाषेचे यथार्थ स्वरूप पूर्णपणे समजू शकत नाही. कारण मौखिक भाषेतील सारे उच्चार, त्यातल्या आघात, हेतू, आरोह-अवरोह हे सारे लिखित भाषेतून दाखविता येणे अशक्य असते. याशिवाय लिखित भाषा उपलब्ध नसलेले निरक्षर लोक आणि आदिवासींसारखे समाज त्यांचे व्यवहार ती उत्तम प्रकारे पार पाडत असते. त्यांच्या मौखिक भाषेला लेखनाचे संस्कार लाभलेले नसतात. भाषा विज्ञान त्यांच्या बोलीचा अभ्यास करीत असते.

भाषा विज्ञानाचे अध्ययन व अध्यापन करताना भाषाविषयक अनेक गैरसमज प्रथम दूर करावे लागतात. अशा गैरसमजांपैकी एक समज असा की, भाषा ही ईश्वर निर्मित आहे. मानवाला ईश्वराने दिलेली ती देणगी आहे. सर्व धर्मातल्या धर्मग्रंथांमधून अशा प्रकारची श्रद्धा व्यक्त झालेली दिसते. परंतु भाषाविज्ञानाच्या अध्ययनातून कळते की भाषा ही समाजाने निर्माण केलेली आहे. सामाजिक जीवन सुकरतेने चालावे, विकसित व्हावे यासाठी मानव समूह रुपात राहू लागल्यावर त्याने ज्या अनेक संस्था निर्माण केल्या त्यापैकी एक महत्त्वाची संस्था म्हणजे भाषा होय. काळाच्या ओघात समाजजीवनात बदल होत जातात त्याप्रमाणे भाषा ही सामाजिक संस्था देखील बदलत जाते. नदीच्या प्रवाहासारखी भाषा कधीही स्थिर नसते, अत्यंत सूक्ष्मपणे आणि नियमितपणे ती बदलत असते. भाषेत होणाऱ्या बदलांचा अभ्यास ऐतिहासिक भाषा विज्ञानात केला जातो. हा अभ्यास एकोणिसाव्या शतकात फार मोठ्या प्रमाणात झाला. विसाव्या शतकात मात्र वर्णनात्मक स्वरूपाचा एककालिक भाषा अभ्यास महत्त्वाचा मानला गेला. या अभ्यासाचे मूळ प्रवर्तक 'फर्दिना- द- सस्यूर' हे भाषाअभ्यासक होत. भाषा विज्ञानाचे अध्ययनातून लक्षात येते की, समाज आणि भाषा यांच्यात अविभाज्य संबंध असतो. जगाच्या पाठीवर आपली हक्काची भूमी नसलेले समाज असतील पण आपली संप्रेषणाची भाषा नसलेला समाज कधीही आणि कुठेही नव्हता.

भाषाविज्ञानाच्या अभ्यासात 'भाषा'या शब्दाचा व्यवहारातला सैल वापर कटाक्षाने टाळता येतो. परंतु भाषाविज्ञानामुळे कळते की, भाषा एक मानवाच्या संदर्भात संभवते. मानवाच्या मुखातून निघणाऱ्या ध्वनीची ती बनलेली असते. ध्वनीच्या जुळणीतून अर्थ व्यक्त करणारे घटक तयार होतात. दोन्ही चिन्हे आणि अर्थ यांचा संबंध याद्दच्छिक असतो. मानवेतरांनाही ध्वनीच्या साह्याने मोजकेच आशय संप्रेषित करता येतात. परंतु मानवाला मात्र भाषेद्वारे अगणित आशय व्यक्त करता येतात आणि तेही मोजके ध्वनी वापरूनच. हे शक्य होते कारण मानवी भाषेत सुटा ध्वनी कोणताच अर्थव्यवस्था करीत नाही. ध्वनी जुळणीतून अर्थयुक्त घटक तयार होतात आणि या अर्थयुक्त घटकांच्या म्हणजे भाषिक रूपांच्या अधिकाधिक मोठ्या म्हणजे शब्द, पदबंद, उपवाक्य, वाक्य अशा रचना करून मनोगत व्यक्त केले जाते. मोजक्या म्हणजे 40-50 ध्वनीच्या साह्याने असंख्य आशयविशेष व्यक्त करण्याची क्षमता फक्त मानवी भाषेतच असते. भाषाविज्ञानात या शब्दाऐवजी 'स्वन' ही संज्ञा वापरली जाते. मानवी भाषांमध्ये वापरल्या जाणाऱ्या स्वनांचा अभ्यास स्वन- विज्ञान (phonetics) या भाषाविज्ञानाच्या शाखेत आधुनिक काळात यंत्राच्या साह्याने केला जातो.

भाषाविज्ञानाच्या अध्ययनात शिक्षकाने समाजमनात पक्के रुजवलेले भाषाविषयक समज दूर केले पाहिजेत. उदा. प्रमाणभाषा ही श्रेष्ठ असते, बोली या गौण, तुच्छ असतात हा समज, भाषा विज्ञान प्रमाणभाषा आणि बोली यांच्यात असा तरतमभाव करीत नाही. संदेशनाचे साधन म्हणून भाषा विज्ञानाच्यादृष्टीने बोली आणि प्रमाण भाषा यांचे महत्त्व सारखेच असते.

कारण आपापल्या जागी आपले कार्य त्या उत्तमप्रकारे पार पाडत असतात. "भाषाशास्त्राच्यादृष्टीने कोणतीही बोली उच्च किंवा नीच नाही, त्याच्या अभ्यासात सर्व बोलींना सारखे स्थान आहे. भाषिक वस्तूस्थिती आहे तशी समजून घेणे आणि रेखाटने हे त्याचे काम आहे'.(२)

सामान्य माणसांना बहुधा आपली भाषा सोपी व मधुर वाटते व इतर भाषा अवघड व कर्कश वाटतात. वैज्ञानिकदृष्टीने पहिले तर हा केवळ भ्रम ठरतो. कोणतीच भाषा पूर्णपणे सोपी व पूर्णपणे अवघड नसते. एका पातळीवर एक भाषा सोपी असते; तर दुसऱ्या पातळीवर ती अवघड असते. उदा. संस्कृत भाषा ही प्रत्ययी भाषा आहे. नाम, सर्वनामे आणि धातू यांच्या प्रत्ययांचा संस्कृतात बुजबुजाट आहे. ही प्रत्यय प्रक्रिया लक्षात ठेवण्यासाठी पाठांतराची गरज असते. परंतु प्रत्यय लावल्यानंतर नामादिकांचे जे रूप तयार होते त्यांच्या साह्याने वाक्यरचना करणे यात फारच सोपे असते. संस्कृतात प्रत्यय लावलेले रूप (म्हणजे शब्द) वाक्यात कुठेही ठेवता येतात; उलट इंग्रजी भाषा बरीचशी विश्लेषणात्मक झालेली आहे. परंतु वाक्यरचनेत शब्दांच्या स्थानाला इंग्रजीत अत्यंत महत्त्व असते. आधुनिक भाषाविज्ञानाच्या परिभाषेत बोलायचे तर संस्कृतची पदीमव्यवस्था अवघड पण वाक्यविचार सोपा असतो; तर इंग्रजी भाषा उलट असते. थोडक्यात, कोणतीच भाषा सर्वस्वी अवघड व सर्वस्वी सोपी नसते आणि माधुर्य, कर्कशपणा हे श्रुतीच्या संदर्भातले जे विशेष, त्याबाबत तर वस्तुनिष्ठ विधान करताच येत नाही.

भाषाविज्ञानाच्या अध्ययनामुळे अनेकदा भाषिक प्रश्न सोडवायला मदत होते. उदा. दक्षिण कोकणी ही मराठीची बोलीभाषा आहे की स्वतंत्र भाषा आहे? या प्रश्नांचे भाषाविज्ञानातील परस्पर आकलनाच्या कसोटीवर परीक्षण करून उत्तर देता येते. डॉ. ना.गो. कालेलकरांनी यासंदर्भात भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून कोकणीला स्वतंत्र भाषा ठरविले आहे.

डॉ. ना.गो. कालेलकरांनी कोकणी यांनी कोकणीच्या बोली यांचे इतर आर्यभाषापेक्षा मराठीशी असलेले साम्य दाखवून देताना म्हटले आहे की, "या बोली इतर कोणत्याही भारतीय आर्य भाषेपेक्षा मराठीला अधिक जवळच्या आहेत. तरी त्यांची बाह्य लक्षणे इतकी भिन्नरूप आहेत की, मराठी भाषिकांना या बोली प्रथम ऐकल्यावर समजणार नाहीत".(३)

आज आधुनिक भाषाविज्ञान महाविद्यालयीन पातळीवर शिकले-शिकविले जाते. स्वनिम म्हणजे पाणिनीने योजिलेला 'वर्ण'हा शब्द होय. भाषाविज्ञानात मराठीचा भाषिक व्यवहार अभ्यासून मराठीची स्वनिममाला निश्चित करण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी सध्या चालवलेला आहे. स्वनिमनिश्चितीची भिन्न तत्वे स्वीकारल्यामुळेच या अभ्यासकात स्वनिमसंख्येबाबत मतभेद आढळतात. परंतु त्याबाबत निश्चिती होणे गरजेचे आहे. दुसरी गोष्ट अशी की शालेय पातळीवर पारंपरिक व्याकरणांनुसार मराठीतील वर्णाची संख्या दाखवली जाते. एका पातळीवर पारंपारिक व्याकरण आणि दुसऱ्या पातळीवर आधुनिक भाषा विज्ञानातील व्याकरण शिकवले जात असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात; अनेक विसंगती निर्माण होतात. शालेय पातळी ओलांडल्यानंतर ज्यांचा मराठीशी संबंध तुटतो त्यांच्या मनात अक्षर, शब्द, वाक्य अशा अनेक संकल्पनांबाबत नुसता गोंधळ असतो.(अक्षरालाच शब्द म्हणणे तर सरसहा आढळते) अशा परिस्थितीत भाषा विज्ञान सोप्या पद्धतीने शालेय पातळीपर्यंत आणता येईल काय? अर्थात मराठी भाषेच्या अभ्यासाबाबत विद्यार्थ्यांना वैज्ञानिकदृष्टी देता येईल काय? याचा विचार तज्ज्ञांनी केला पाहिजे.

आधुनिक भाषाविज्ञानाच्या अध्ययन अध्यापनात स्वनविज्ञान, स्वनिमविचार, पदविचार, वाक्यविचार आणि शेवटी अर्थविचार या विभागात विभागलेला अभ्यास असतो. शालेय पातळीवर मात्र त्याचा मागमुसही नसतो. आधुनिक भाषाविज्ञानात संरचनावादी भाषा विज्ञानाचे ब्ल्यूमफिल्डप्रणित प्रारूप समोर ठेवलेले असते. त्यावर चॉम्स्किने घेतलेले आक्षेप व चॉम्स्कीच्या

पद्धतीचा अभ्यासही शिकला- शिकवला जातो. त्याचा मागमुसही पारंपरिक पद्धतीच्या मराठीच्या व्याकरणाच्या अभ्यासात नसतो. ही तफावत केव्हातरी दूर व्हायला हवी असे वाटते.

## संदर्भ टीपा :

(१) 'भाषाविज्ञान परिचय'(भाषेचे स्वरूप आणि उपयोग), डॉ. अंजली सोमण, संजय प्रकाशन, 917/12, फर्ग्युसन कॉलेज रोड-पुणे 411004 प्रथमावृत्ती 25 डिसेंबर 1987, पृष्ठ क्र. 13.
(२)'भाषा आणि संस्कृती'(कोकणी), ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई-4, पहिली आवृत्ती 15 ऑगस्ट 1962, पृष्ठ क्र. 121.
(३) तत्रैव, पृष्ठ क्र. 114.